मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आयुक्त शेखर सिंह यांनी घेतला नागरिकांच्या तक्रारींचा विभागनिहाय आढावा

## नागरिक प्रत्यक्ष कार्यालयात येऊन अथवा विविध पोर्टलद्वारे तक्रारी नोंदवित असतात : तक्रारींचा निपटारा करण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी नियोजन करून कार्यवाही करण्याचे निर्देश



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या विविध सेवा सुविधा तसेच कामकाजाबाबत नागरिक प्रत्यक्ष कार्यालयात येऊन अथवा विविध पोर्टलद्वारे तक्रारी नोंदवित असतात. त्याकडे प्राध्यान्याने लक्ष देऊन या तक्रारींचा निपटारा वेळेत करण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी नियोजन करून कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.

महापालिकेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध सेवा सुविधा आणि कामकाजाबाबत नागरिकांच्या आलेल्या तक्रारींचा विभागनिहाय सर्वंकष आढावा आयुक्त शेखर सिंह यांनी घेतला त्यावेळी सबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी याबाबत सूचना केल्या.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये झालेल्या आढावा बैठकीमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा वित्त संचालक प्रविण जैन, मुख्य लेखापरिक्षक प्रमोद भोसले, नागरी सुविधा केंद्राचे उपआयुक्त राजेश आगळे यांच्यासह सहशहर अभियंता, उप आयुक्त सहाय्यक आयुक्त, क्षेत्रीय अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सेवा आणि कामकाजाबाबतच्या नागरिकांच्या तक्रारी आपले सरकार, सारथी ॲप, पी.जी. पोर्टल, सी.एम.ओ. पोर्टल आदी माध्यमांद्वारे महापालिकेकडे प्राप्त होत असतात. तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यावर आवश्यक कार्यवाही करून सबंधित विभागाद्वारे तक्रारींचे विहित वेळेत निराकरण करावे, यासाठी सर्वांनी योग्य समन्वय ठेवून सुक्ष्म नियोजन करावे आदी सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

---

# आमदार लांडगे यांच्या गडाला सुरुंग; भाजपचे पदाधिकारी अजित गव्हाणे यांच्या प्रचारात

## मोशी परिसरात अजित गव्हाणे यांची प्रचारात आघाडी



**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभेचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पक्षाचे अजित गव्हाणे यांनी आणखी एक धक्का दिल्याचे दिसून आले. भाजपचे माजी क्रीडा सभापती लक्ष्मण सस्ते यांनी भाजपला 'रामराम' करत तुतारी फुंकण्याचा निर्धार केला आहे. याचीच परिणीती मोशी परिसरात दिसून आली. गव्हाणे यांच्या प्रचारात लक्ष्मण सस्ते यांनी पुढाकार घेतला असून, यामुळे मोशी परिसरात भाजपला मोठा धक्का बसणार असल्याचे मानले जात आहे.

भोसरी विधानसभेमध्ये प्रचाराचा वेग वाढला आहे. प्रचाराची रंगत वाढत असताना भाजपला मात्र मोठा धक्का बसला आहे. भोसरी विधानसभेचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांचे कट्टर समर्थक, क्रीडा समितीचे माजी सभापती व माजी नगरसेवक लक्ष्मण सस्ते यांनी लांडगे यांना रामराम करत अजित गव्हाणे यांना पाठिंबा दिला आहे. याच पार्श्वभूमीवर लक्ष्मण असते हे गव्हाणे यांच्या प्रचारात उतरल्याचे दिसले.

मोशी भागामध्ये सस्ते कुटुंबीयांची मोठी ताकद आहे. सस्ते कुटुंबियांकडून गव्हाणे यांना पाठिंबा मिळाल्यामुळे या भागात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची ताकद वाढल्याचे म्हटले जात आहे. लक्ष्मण सस्ते याप्रमाणेच आणखीही पदाधिकारी गव्हाणे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी मोशी परिसरामध्ये प्रचारात आघाडी घेतली असल्याचे पाहायला मिळत आहे. गावठाण भाग आणि नव्याने विकसित होत असलेल्या हौसिंग सोसायटी यामुळे या भागाचे महत्व आहे. माजी नगरसेवक लक्ष्मण सस्ते यांचा पाठिंबा मिळाल्याने गव्हाणे यांची या भागात ताकद वाढणार आहे. एकीकडे विद्यमान आमदार महेश लांड गे यांना हा मोठा धक्का मानला जात असताना. मोशी परिसरात "तुतारी'चा आवाज चांगलाच घुमणार असल्याचे बोलले जात आहे.

### गव्हाणे यांचे नेतृत्व मान्य – लक्ष्मण सस्ते

» याबाबत लक्ष्मण सस्ते म्हणाले अजित गव्हाणे हे सुसंस्कृत उच्चशिक्षित आणि या शहराशी नाळ जोडलेले व्यक्तिमत्व आहे. गव्हाणे कुटुंबातील तिसरी पिढी या भागाचे प्रतिनिधित्व करत असून, भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या गरजा नक्की कोणत्या आहेत हे त्यांना माहीत आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी शहरातील अनेक पूल, ग्रेड सेपरेटर, पाण्याच्या टाक्या, रस्ते यांचे नियोजन केले.

---

# संविधान भवनाच्या उभारणीसाठी 120 कोटी रुपयांची निविदा!

## आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेला अखेर मूर्त स्वरुप



**पिंपरी | प्रतिनिधी**

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश भारतीय लोकशाहीचा पाया संविधान अर्थात राज्यघटना आहे. या राज्यघटनेचा प्रचार, प्रसार आणि जनजागृती व्हावी. या करिता देशातील पहिले संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये उभारले जात आहे. त्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सुमारे 120 कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात केली असून, निविदा प्रसिद्ध केली आहे.

भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण च्या पेठ क्रमांक 11 मध्ये संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यासाठी पीएमआरडीएकडून संबंधित जागा महानगरपालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे.

दरम्यान, महानगरपालिका अंदाजपत्रक समितीच्या माध्यमातून पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील निविदा प्रक्रियेला मंजुरी दिली आहे. पहिल्या टप्प्याची ई-निविदा दोन कोटी 53 लाख 25 हजार 407 आणि दुसऱ्या टप्प्यातील सुमारे 117 कोटी अशी एकूण 119 कोटी 71 लाख 35 हजार 326 रुपयांची निविदा प्रक्रिया राबवण्यात येत आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, 2019 मध्ये पिंपरी-चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या माध्यमातून संविधान भवन उभारणीसाठी पाठपुरावा सुरू केला. त्यानंतर 'पीसीएनटीडीए'चे विलिनीकरण पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरणामध्ये करण्यात आले. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात सदर प्रकल्प लांबणीवर पडला. महायुतीची सत्ता आल्यानंतर २०२२ मध्ये पुन्हा या कामाला गती देण्यात आली. प्रस्तावित जागा 'पीएमआरडीए'कडून महानरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडेही आम्ही पाठपुरावा केला. आता संविधान भवन उभारणीसाठी निविदा प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण होत आहे.

> भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरीत होवून शहरात संविधान तथा राज्य घटनेचा प्रचार, प्रसार व्हावा. यासह जगभरातील लोकशाही देशाच्या घटनांचा अभ्यास करता यावा, असा संकल्प आहे. संविधान जागृती आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी उभारण्याच्या कामाला गती द्यावी, अशी सूचना महापालिका प्रशासनाला केली होती. संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये साकारले जात आहे, ही आम्हा पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे.
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# पुण्यात लैंगिक अत्याचारांच्या वाढत्या घटनांमुळे महिला संतप्त

## विनयभंग, सोशल मिडियावरील छेडछाड, महाविद्यालयीन मुलींचा पाठलाग अशा अनेक घटना दररोज घडत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात दिवसागणिक महिला आणि अल्पवयीन बालकांवर लैंगिक अत्याचारांच्या घटना उजेडात येऊ लागल्या आहेत. बलात्कार, विनयभंग, सोशल मिडियावरील छेडछाड, महाविद्यालयीन मुलींचा पाठलाग अशा अनेक घटना दररोज घडत आहेत.

या लैंगिक अत्याचारांमुळे अल्पवयीन मुली गर्भवती राहिल्याच्या घटनादेखील वाढीस लागल्या आहेत. पुण्यातील एका नामांकित महाविद्यालयातील बारावीच्या मुलीवर तिच्या मित्रांनी केलेला लैंगिक अत्याचार, वानवडी येथे शाळकरी मुलींसोबत स्कूल व्हॅन चालकाने केलेले अश्लील कृत्य, वारजे येथे वडिलांनी मुलीवर वर्षभरापासून केलेला पाशवी बलात्कार या घटना उजेडात आल्या. पुण्याला हादरवून सोडणारी घटना घडली आहे. कोंढव्यातील बोपदेव घाटात मित्रासोबत फिरायला गेलेल्या गेलेल्या महाविद्यालयीन



### तीन दिवसांपूर्वी याच घाटात तरुणीचा विनयभंग

» तीन दिवसांपूर्वी मित्रासोबत बोपदेव घाटात फिरायला गेलेल्या तरुणीचे मोटारीतून अपहरण करून तिचा विनयभंग करण्यात आला होता. याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी कारचालक राजेखाँ करीम पठाण (वय ३६, रा. कोंढवा) याला अटक केली. पिडीत तरुणीने यासंबंधी फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुणी मित्रासोबत बोपदेव घाटात फिरायला गेली होती. मोटारीतून आलेल्या पठाणने मानवाधिकार संघटनेचा कार्यकर्ता असल्याची बतावणी केली. या ठिकाणी जोडप्यांना बंदी असल्याचे सांगत दोघांची छायाचित्रे काढली. तरुणीला धमकावत कारमध्ये बसवले. कार खडी मशीन चौकात मधील एका बोळात उभी करून तिचा विनयभंग केला. यानंतर तिला चौकात सोडून आरोपी पसार झाला होता.

तरुणीवर तिघांनी बलात्कार केला. मित्राचे हातपाय बांधून ठेवत तिच्यावर अत्याचार करण्यात आले. एकापाठोपाठ घडत असलेल्या अत्याचाराच्या या घटनांमुळे मुलीबाळींनी घराबाहेर पडायचे की नाही, असा संतप्त सवाल महिला विचारू लागल्या आहेत.

> बोपदेव घाटात परिसरात गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास मित्राबरोबर फिरायला आलेल्या तरुणीवर तिघांनी बलात्कार केल्याची घटना घडली. तरुणीच्या मित्राने तिला रुग्णालयात दाखल केले होते. त्यानंतर या घटनेची माहिती शुक्रवारी पहाटे पाचच्या सुमारास रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना दिली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, बलात्कार करुन पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी दहा पथके तयार केली आहेत.
>
> - रंजनकुमार शर्मा, सहपोलीस आयुक्त, पुणे.

> बोपदेव घाटात एका मुलीवर सामूहिक अत्याचार झाल्याची घटना उजेडात आली आहे. पुणे आणि राज्यभरात सातत्याने महिलांवरील अत्याचारांच्या घटना वाढतच आहेत. या घटनांना पायबंद घालण्यासाठी गृहखाते काहीही करताना दिसत नाही. दुर्दैवाने महाराष्ट्र महिलांसाठी सुरक्षित राहिलेला नाही, असे म्हणावे लागत आहे. शासनाने सदर घटनेतील आरोपींना गजाआड करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.
>
> - सुप्रिया सुळे, खासदार.

> पुण्यातील बोपदेव घाट येथे २१ वर्षीय मुलीवर सामुहिक बलात्काराची संतापजनक घटना घडली. या प्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पोलीस आयुक्तांना फोन करून तपास करण्याचे आदेश दिले आहेत. पुणे पोलीस तसेच क्राईम ब्रांच अशी संपूर्ण यंत्रणा कामाला लागली असून आरोपींचे स्केच तयार करण्यात आले आहे. युद्धपातळीवर शोध घेतला जात आहे. या लिंगपिसाट हरामखोर नराधमांना पोलीस पाताळातूनसुद्धा शोधून काढतील आणि त्यांना कठोरात कठोर शिक्षा होईल, याची मला खात्री आहे.
>
> - चित्रा वाघ, अध्यक्षा, भाजपा महिला मोर्चा.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव; पिंपरी चिंचवड शहरात 27 ठिकाणी कार्यक्रम

## संघ स्वयंसेवकांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती राहणार, प्रत्येक ठिकाणी विविध प्रात्यक्षिके होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे प्रतिवर्षाप्रमाणे रविवार दि.६ ऑक्टोबर रोजी शहरातील विविध भागातील १९ ठिकाणी तर दि.५, १२ व १३ रोजी ८ स्थानी विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रहित, शक्तिसंचयन आणि सेवाकार्यासाठी सदैव कटिबद्ध असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे दरवर्षी विजयादशमी उत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी पिंपरी चिंचवड शहरातील २७ विविध भागात मोठ्या संख्येने स्वयंसेवक आणि नागरिक या उत्सवात सहभागी होणार आहेत. या वेळी शारीरिक, घोष प्रात्यक्षिके, गीत गायन या सामूहिक कार्यक्रमांसह पारंपरिक शस्त्रपूजन, अनुभवी वक्त्यांचे मार्गदर्शन लाभणार असून विविध क्षेत्रांतील मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

त्याचबरोबर दि.१२ ऑक्टोबर रोजी विविध भागात पथसंचलनाचे



देखील आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन संघाचे पिंपरी चिंचवड जिल्हा संघचालक विनोद बन्सल यांनी केले आहे.

संभाजी नगरठिकाण : घरकुल डि लाईन मैदान. देहुरोड ठिकाण : व्हिडीआर मैदान, देहू स्थान – भैरवनाथ चौक, चिंचोली, निगडी ठिकाण : मॉडर्न शैक्षणिक संकुल, चिखलीस्थान – जगदगुरू संत तुकाराम महाराज सभागृह, टाऊन हॉल, चिखली सांगवी संत तुकाराम नगर –पंडित दीनदयाळ उपाध्याय मनपा शाळा,कासारवाडी –ज्ञानेराज माध्यमिक शाळा मैदान, शास्त्री नगर,पिंपळे गुरव रामकृष्ण मंगल कार्यालय,सांगवी – संस्कृती मंगल कार्यालय, शितोळे पेट्रोल पंपजवळ, नवी सांगवी,पिंपळे निलख – स्थान – चोंधे पाटील क्रीडा संकुल, विशाल नगर,पिंपळे सौदागर स्थान:- बाळासाहेब कुंजीर मैदान,काळेवाडी – रहाटणी स्थान – ज्योतिबा उद्यान वाहनतळ, पवना नगर, पिंपरीस्थान – नवमहाराष्ट्र विद्यालय ,चिंचवड पूर्वस्थान – स्व.जिजाबाई गावडे उद्यान,चिंचवड पश्चिम स्थान – मोरया गोसावी क्रीडा संकुल ,रावेत – स्थान – शुभम गार्डन, वाल्हेकरवाडी ,वाकड –स्थान:- रिलायन्स मॉल समोर, वाकड,पुनावळे –स्थान – बालाजी विद्यापीठ, थेरगाव – स्थान – बिर्ला हॉस्पिटल रोड, गंगा आशयाना सोसायटी समोरील मैदान, थेरगाव ,हिंजवडी –स्थान – ब्ल्यू रिज पब्लिक स्कूल, हिंजवडी, आकुर्डी –स्थान – सावरकर मैदान, संत तुकाराम महाराज बागेजवळ, आळंदी – स्थान – नानाश्री लॉन्स, घोलप वस्ती, चऱ्होली खुर्द,चऱ्होली –स्थान – किड्स पेराडाईज शाळा,काळे कॉलनी ,भोसरी –स्थान – छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय,दिघी स्थान – राघव मंगल कार्यालय ,मोशी –स्थान – न्यू इंद्रायणी शाळा, शिवाजीवाडी इंद्रायणी नगर – स्थान – सुधा माता मंदिराजवळ, गंधर्व नगरी

# तनिश असोसिएटसच्या भागीदारांच्या विरोधात त गुन्हा दाखल

## ॲमेनिटीज तसेच मेटेंनन्सच्या नावाखाली वसुल केलेल्या रक्कमेचा हिशोब दिला नाही.




**पिंपरी | प्रतिनिधी**

तनिश ऑर्चीड सोसायटीमध्ये राहणाऱ्या सभासद यांना बिल्डरने महानगरपालिकेचा बांधकाम प्रकल्प पुर्णत्वाचा दाखला, महारेराने निर्देशीत केलेल्या वेळेत निवासी गृहप्रकल्प पुर्णत्वाचा दाखला आणि छापील ब्रोशरमध्ये देऊ केलेल्या ॲमेनिटीज तसेच मेटेंनन्सच्या नावाखाली वसुल केलेल्या रक्कमेचा हिशोब दिला नाही. सोसायटीच्या जागेचे अभिहस्तांतरण सोसायटीच्या नावे करुन दिले नाही, असं फिर्यादीत नमूद आहे.

हा प्रकार (दि. १८/०२/२०२३ ते दि.०२/१०/२०२४ पर्यंत) तनिश ऑर्चिड सोसायटी, च-होली बु. ता. हवेली, पुणे येथे घडला. फिर्यादी संदीप विश्वनाथ नाईकवाडे (वय ४१ वर्ष, रा. तनिश ऑर्चिड सोसायटी, च-होली बु.) यांनी आरोपी मे. तनिश असोसिएटसचे भागीदार १. राजु मोहनलाल मेहता, २. श्रेणीक निर्मल परमार, ३. दिलीप शांतीलाल सोलंकी यांच्या विरोधात फिर्याद नोंदविली आहे.

दिघी ४२४/२०२४ मोफा कायदा कलम. ३, व १३ नुसार तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. पोहवा / ७०० गवारी पुढील तपास करीत आहेत.

# ‘ऑनलाइन’ स्वरुपात मालमत्तेबाबत हरकतीचा निपटारा सुखकर

## करसंकलन विभागाकडून ‘क्यूआर कोड’चा वापर करण्याचे मालमत्ताधारकांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील सर्व प्रकारच्या मालमत्तांचे, कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. यामध्ये ८,५५,१०२ मालमत्तांना सलग अनुक्रमांक (जिओ सिक्वेन्सिंग) देण्यात आले असून ५,३२,३०७ मालमत्तांचे अंतर्गत मोजमाप करण्यात आले आहे.

मालमत्ता सर्वेक्षणांतर्गत करण्यात आलेल्या मोजमाप प्रक्रियेमध्ये नव्याने निदर्शनास आलेल्या मालमत्तांपैकी ५२,७८७ मालमत्तांपर्यंत विशेष नोटिस १ चे वाटप करण्यात आले असून यामधील २२,५८२ मालमत्ताधारकांनी हरकती दाखल केल्या असून त्यापैकी १६,९५३ मालमत्ताधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असून त्यांना अंतिम बिल मिळाले आहे. यामधील ४,२६१ मालमत्ताधारकांनी ८,९९५४,२८९ रुपये कराचा भरणा केला असून ४,१३४ मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरुपात कर भरुन त्यावरील सवलतींचा लाभ घेतला आहे.




### ऑनलाइन पद्धतीने हरकत दाखल करणे आहे ‘सोपे’..

आत्तापर्यंत विशेष नोटिस १ मिळालेल्या मालमत्ताधारकांपैकी २२,५८२ मालमत्ताधारकांनी हरकती दाखल केल्या असून यापैकी २०,४७५ मालमत्ताधारकांनी ऑफलाइन पद्धतीने, तर २,१०६ मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरूपात हरकती दाखल केल्या आहेत. नागरिकांनी मिळालेल्या नोटिसवरील ‘क्यूआर कोड’ स्कॅन करून ऑनलाइन पद्धतीनेच नोटिस मान्य करून आपले बिलसुद्धा प्राप्त करावे व त्यानंतर आपला मालमत्ताकराचा भरणाही ऑनलाइन स्वरूपात करण्यासाठी सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासोबतच ज्या नागरिकांना मालमत्तेबाबत हरकत दाखल करावयाची असेल त्यांनी ऑनलाइनरीत्या हरकत दाखल केल्यानंतर त्यावर तत्काळ निपटारा आणि हरकतीवर सुनावणीसुद्धा ऑनलाइन स्वरूपात घेण्यासाठी प्राधान्य देण्यात येत आहे. नागरिकांनी हरकत दाखल करताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर हरकतीवर सुनावणीची प्रक्रिया करण्यात येणार आहे, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाकडून करण्यात आले आहे.

### विशेष नोटिस १ प्राप्त झाल्यानंतर हरकतींसाठी २१ दिवसांची मुदत..

ज्या मालमत्ताधारकांना विशेष नोटिस १ प्राप्त झाल्यानंतर नोटिस अमान्य असल्यास हरकत दाखल करण्यासाठी २१ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. मालमत्ताधारकांनी आपल्या मालमत्तेबाबत, करयोग्य मूल्य मान्य नाही, आकारणी दिनांक मान्य नाही, करपात्र क्षेत्रफळ मान्य नाही, मालमत्तेवरील नावामध्ये चूक, मालमत्तेवरील पत्ता चुकीचा, मोबाइल क्रमांक व ई-मेल आयडी चुकीचा इत्यादीबाबत हरकती दाखल करता येत आहेत. नागरिकांनी अशा हरकतींबाबत आवश्यक कागदपत्रांची ऑनलाइन पद्धतीनेच पूर्तता करून हरकतीवर सुनावणी करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष नोटिस प्राप्त झाल्यानंतर २१ दिवसांच्या आत वरील हरकती असतील तर त्या दाखल करणे आवश्यक असणार आहे, असे आवाहन करसंकलन विभागामार्फत करण्यात आले आहे.

> ‘‘ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागामार्फत शहरात सर्वच मालमत्तेचे सर्वेक्षण सुरू आहे. सर्वेक्षणांर्गत नव्याने निदर्शनास आलेल्या मालमत्तांना विशेष नोटिस १ वाटप करण्यात येत आहे. ज्या मालमत्ताधारकांना आपल्या नोटिसवर हरकती नोंदवायच्या असतील, अशा मालमत्ताधारकांनी नोटिसवर दिलेल्या ‘क्यूआर कोड’द्वारे ऑनलाइन पद्धतीने प्रक्रिया पूर्ण करावी. नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेकडून ऑनलाइन पद्धतीने जलद गतीने निपटारा करण्यात येत असून त्याचा लाभ घ्यावा.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका.

### नव्या आकारणी झालेल्या मालमत्तांना करावर असतील ‘सवलती’...

ज्या मालमत्तांची चालू वर्षी नव्याने आकारणी झाली आहे, अशा मालमत्तांना बिल लागू झाल्यापासून तीन महिन्यांपर्यंत विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. यामध्ये मालमत्ताधारकांनी आगाऊ कर भरल्यास ५ टक्के तर ऑनलाइन स्वरूपात कर भरल्यास ५ टक्के, महिलांच्या नावे असलेल्या एका निवासी घरास ३० टक्के, दिव्यांग व्यक्तींच्या नावे असलेल्या मालमत्तेस ५० टक्के, झिरो वेस्ट आणि ‘एसटीपी प्लँट’ कार्यान्वित असल्यास १० टक्के, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारल्यास २ टक्के, ग्रीन बिल्डिंग रेटिंगमध्ये ३ ते ५ रेटिंग असणाऱ्या मालमत्तांना ५ ते १० टक्क्यांच्या सवलतींचा लाभ घेता येणार आहे.

# राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून मावळसाठी 44 कोटींचा निधी

## पूर, दरड प्रतिबंधक उपयोजना करणार : खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे आणि रायगड या दोन जिल्ह्याचा समावेश असलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी आला आहे. आता मावळ विधानसभा मतदारसंघातील क्षेत्रासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून 44 कोटी 10 लाख कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. या निधीतून पूर, दरड प्रतिबंधक उपयोजना करण्यात येणार आहेत.



खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून मतदारसंघातील विविध कामांसाठी निधी मिळण्याकरिता केंद्र, राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. राज्य शासन, पुणे, रायगड जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मतदारसंघातील विविध कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी आणला आहे. त्यातून गाव, वस्ती, वाड्यातील, आदिवासी पाड्यावरील अंतर्गत रस्ते करण्यात आले. मावळ विधानसभा मतदारसंघातील पूर, दरड प्रतिबंधक उपयोजना करण्यासाठी निधी मिळण्याकरिता खासदार बारणे यांनी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे पाठपुरावा केला. अखेरीस त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

त्यामध्ये वाऊंड येथे दरड प्रतिबंधक संरक्षक भिंत बांधण्यासाठी 1 कोटी 59 लाख 7910, वाडेश्वर 1 कोटी 23 लाख 88 हजार 871, फळणे, फलाने 1 कोटी 2 लाख 38 हजार 987 रुपये, मालेवाडी येथील दरडप्रवण क्षेत्राची उपाययोजना करण्यासाठी संरक्षक भिंत बांधण्याकरिता 1 कोटी 51 लाख 45 हजार 799, वाकसाई देवघर येथील संभाव्य दरड संरक्षक भिंत बांधण्यासाठी 2 कोटी 69 लाख 46 हजार, आतवणसाठी 96 लाख 57 हजार, साई येथील भिंत बांधण्यासाठी 91 लाख 5945, वाकसाई येथे राखून ठेवणारी भिंत बांधण्यासाठी 2 कोटी 69 लाख 45 हजार 695, शिलाठाणे 1 कोटी 16 लाख 67 हजार 933, पांगळोली 45 लाख 49 हजार 889, पाटण 1 कोटी 53 लाख 70 हजार 915, दुधीवारे 7 कोटी 64 लाख 68 हजार 228, भाजे 7 कोटी 64 लाख 68 हजार 288, मोरवे 60 लाख 11 हजार 451, वेरगाव 2 कोटी 63 लाख 53 हजार 23, तुंग येथील राखून ठेवणारी भिंत बांधण्यासाठी 4 कोटी 61 लाख 2544, भोईनीतील आरसीसी भिंत बांधण्यासाठी 4 कोटी, दसवे येथील 13 कोटी रुपयांचा असा एकूण 44 कोटी 10 लाख 89 हजार 431 निधी मिळाला आहे.

मावळमध्ये मोठ्या प्रमाणात दरडी, पूर प्रवण क्षेत्र आहेत. पावसाळ्यात दरडी कोसळण्याच्या घटना घडतात. या दुर्घटनेत मृत्यु होतात. पावसाळ्यात रस्ते बंद करावे लागतात. त्यामुळे दरडीची दुरुस्ती केली जाणार असल्याचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.

# राहुल गांधींना पुणे न्यायालयाचे समन्स

## वीर सावरकरांच्या बदनामी प्रकरणी पुणे न्यायालयाचे समन्स : 23 ऑक्टोबरला हजर राहण्याचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

कर्नाटकमधील काँग्रेसच्या एका मंत्र्याने काही दिवसांपूर्वीच वीर सावरकर यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केल्यानंतर वाद उद्भवला होता. त्यानंतर आता पुणे न्यायालयाने एका जुन्या प्रकरणात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना समन्स बजावले आहे. वीर सावरकर यांचे पणतू सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधी यांच्या विरोधात फौजदारी खटला दाखल केला होता. मार्च २००३ साली इंग्लंडच्या दौऱ्यात राहुल गांधी यांनी हिंदुत्ववादी विचारसरणीबाबत बदनामीकारक विधान केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.



वीर सावरकर यांचे पणतू सात्यकी सावरकर यांनी मागच्या वर्षी एप्रिल महिन्यात पुणे सत्र न्यायालयात राहुल गांधींच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. राहुल गांधी यांनी वीर सावरकर यांच्याबाबत अपमानजनक विधान केल्याचा त्यांनी आरोप केला होता. सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधी यांनी ५ मार्च २०२३ रोजी इंग्लंड येथे केलेल्या एका भाषणाचा व्हिडीओ यासाठी सादर केला होता. या प्रकरणी राहुल गांधी यांना आता २३ ऑक्टोबर रोजी न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सात्यकी सावरकर आपल्या तक्रारीत म्हणाले की, राहुल गांधी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने माझे आजोबा सावरकर यांचा जाणूनबुजून अवमान करत आहेत. लंडन येथे ५ मार्च २०२३ रोजी ओव्हरसिस काँग्रेसला संबोधित करताना त्यांनी ओढूनताणून सावरकरांना मध्ये आणले आणि त्यांच्याबद्दल बदनामीकारक विधान केले. राहुल गांधी सावरकरांच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत.

सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधींवर आरोप करताना म्हटले की, त्यांनी जाणूनबुजून अशा शब्दांचा वापर केला, ज्यामुळे संपूर्ण सावरकर कुटुंबियांना मानसिक त्रास झाला. त्यामुळेच राहुल गांधी यांच्यावर कायदेशीर खटला चालवून त्यांना योग्य ती शिक्षा देण्यात यावी. तसेच अब्रुनुकसानीबद्दल त्यांच्याकडून नुकसान भरपाईही मिळावी.

राहुल गांधी यांनी वीर सावरकर यांच्याबाबत अनेकदा विधान केले आहे. नुकतेच त्यांना नाशिक न्यायालयानेही समन्स बजावले होते. एका स्वयंसेवी संस्थेच्या संचालकाने गांधींच्या विरोधात याचिका दाखल केली होती. नोव्हेंबर २०२२ मध्ये भारत जोडो यात्रेदरम्यान हिंगोली येथे पत्रकार परिषद घेतली असताना राहुल गांधी यांनी वीर सावरकर यांच्याबाबत विधान केले होते. राहुल गांधींनी जाणूनबुजून आपल्या विधानाद्वारे सावरकरांच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवली, असा आरोप याचिकाकर्त्यांनी केला होता.

कर्नाटकचे मंत्री दिनेश गुंडू यांच्या वादग्रस्त विधानावर वीर सावरकर यांचे नातू रणजीत सावरकर यांनी टीका केली होती. ते म्हणाले की, काँग्रेसतर्फे वारंवार सावरकर यांच्याबाबत अपमानजनक विधान केले जात आहे. जेव्हा निवडणुका येतात, तेव्हा अशी विधाने केली जातात. राहुल गांधी हे करत आले आहेत आणि आता त्यांच्या पक्षाचे नेतेदेखील अशीच विधाने करत आहेत. निवडणुका जिंकण्यासाठी काँग्रेसकडून फोडा आणि राज्य करा, ही रणनीती वापरली जात असल्याचा आरोप रणजीत सावरकर यांनी केला.

### नाशिक कोर्टानेही समन्स बजावले

**» यापूर्वी नाशिक न्यायालयानेही त्यांना याच प्रकरणात समन्स बजावले आहे. नाशिकच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी दीपाली परिमल कडूसकर यांनी राहुल गांधी यांना 27 ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्याचे समन्स (नोटीस) बजावले आहेत.**

### न्यायालयाने आदेशात काय म्हटलं आहे?

**» न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, महापुरूष वीर सावरकर यांच्याविरोधात राहुल गांधी यांनी केलेले विधान प्रथमदर्शनी मानहानीकारक असल्याचे दिसते. या खटल्याच्या पुढील तारखेला राहुल गांधी यांना वैयक्तिकरित्या किंवा त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत न्यायालयात हजर राहावे लागेल, असे न्यायालयाने म्हटले आहे.**

# पणन, बाजार समिती संघात 'लेटर वॉर'

## राज्य बाजार समिती सहकार संघाचे अध्यक्ष प्रवीण नाहाटा यांनी 17 बाजार समित्यांच्या प्रस्तावांची माहिती 'पणन'ला कळवली

**पुणे | प्रतिनिधी**

राज्याच्या पणन संचालनालय स्तरावर कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे कायद्यातील कलम 12 (1) अन्वये द्यावयाच्या विविध कामांच्या मंजुरीबाबतचे कोणतेही प्रस्ताव प्रलंबित नसल्याचे पणनचे म्हणणे आहे. तर राज्य बाजार समिती सहकारी संघाचे अध्यक्ष प्रवीण नाहाटा यांनी प्रलंबित असलेल्या 17 बाजार समित्यांच्या प्रस्तावांची माहिती कामाच्या स्वरूपासह पणनला कळविल्याने पणन संचालनालय विरुद्ध बाजार समिती संघात 'लेटर वॉर' सुरू झाले आहे.

महाराष्ट्रातील कृषी उत्पन्नचे सभापती, उपसभापती, सचिवांच्या अडीअडचणींचा आढावा घेण्याकामी पुण्यात राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेतून पणनमंत्री अब्दुल सत्तार कोणतेही उत्तर न देता निघून गेल्याने बाजार समित्यांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.दरम्यान, पणन संचालक विकास रसाळ यांनी राज्य बाजार समिती संघाला शुक्रवारी (दि.4) पत्र दिले आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) 1963 चे कलम 12 (1) अन्वये दाखल झालेले प्रस्ताव प्रलंबित असल्याचे म्हणणे या परिषदेत असल्याचे वृत्त प्रसिध्द झाले. त्यावर कोणत्या बाजार समितीचे व कोणत्या कामासाठीचे प्रस्ताव पणन संचालनालयाकडे प्रलंबित आहेत, याचा तपशील देण्याबाबत कळविले.

त्यावर राज्य बाजार समिती सहकारी संघाने बाजार समित्यांची नावे व प्रलंबित प्रस्ताव कामाच्या स्वरूपासह तत्काळ पणन संचालकांना शुक्रवारी सायंकाळीच माहिती कळविली. त्यामध्ये परतूर (जालना), आरमोरी (गडचिरोली), पंढरपूर (सोलापूर), कोपरगाव (अहमदनगर), राजूरा (चंद्रपूर), वर्धा, बाळापूर (अकोला), चिमूर (चंद्रपूर), परंडा (धाराशिव), मेहकर (बुलडाणा), रामटेक (नागपूर), कळमेश्वर (नागपूर), पारशिवणी (नागपूर) दिग्रस (यवतमाळ), अहेरी (गडचिरोली), मूल (चंद्रपूर), महागाव (यवतमाळ) यांचा समावेश आहे.

### शेतकरी भवनासाठीचे आठ प्रस्ताव प्रलंबित

**» पणन संचालनालय विभागाकडे कलम 12 (1) अन्वये बाजार समित्यांच्या प्रलंबित प्रस्तावात जवळपास आठ प्रस्ताव हे शेतकरी भवन उभारण्याचे आहेत. पणन मंडळाचे कर्जफेडीसाठी जमीन विक्रीचा प्रस्ताव, गाळे, कंपाऊंड व गेट, सौरऊर्जा प्रकल्प, सीसीटीव्ही प्रणाली, कांदा लिलाव जागेत काँक्रिटीकरण, ओपन शेड, व्यापारी गाळे, गोदाम बांधाकाम, शॉपिंग कॉम्प्लेक्स, ड्रेनेज व विविध बांधकामांच्या परवानगीसाठीच्या प्रस्तावांचाही समावेश आहे.**